Please Consider the Environment Before Printing…

Date: 27/06/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष



## सुरांचा बादशहा आर. डी. बर्मन

राहुल देव बर्मन म्हणजेच आर. डी. हे प्रसिद्ध संगीत दिग्दर्शक होते. त्यांना हिंदी चित्रपट संगीत क्षेत्रातील सर्वात महान आणि यशस्वी संगीत दिग्दर्शकांपैकी एक मानले जाते. पंचम असे टोपणनाव असलेले ते संगीतकार सचिन देव बर्मन यांचे ते एकुलते एक पुत्र होते. बर्मन यांचा जन्म २७ जून १९३९ रोजी झाला. त्यांना बालपणापासूनच संगीताचं बाळकडू मिळालं होतं. त्यांचे वडील एस. डी. बर्मन हेसुद्धा सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शक होते. १९६० ते १९९० च्या दशकापर्यंत बर्मन यांनी ३३१ चित्रपटांसाठी संगीत रचना केली. बर्मन यांनी दिग्गज गायिका लता मंगेशकर, आशा भोसले आणि किशोर कुमार यांच्यासोबत काम केले. त्यांनी गीतकार गुलजार यांच्यासोबतही दीर्घकाळ काम केले. त्यांच्यासोबत त्यांच्या कारकिर्दीतील काही अविस्मरणीय गाणी आहेत.

आर. डी. बर्मन यांनी संगीत दिलेली सगळीच गाणी ही नेहमीच चिरतरुण आहेत. त्यांच्या गाण्यांनी प्रेक्षकांना नेहमीच मनमुराद आनंद दिला आहे. तिसरी मंजिल, पडोसन, आंधी, सत्ते पे सत्ता, प्यार का मौसम, सागर, कटी पतंग, कसमे वादे, घर, गोल माल, खुबसूरत, रॉकी, लव्ह स्टोरी, सीता और गीता, रामपूर का लक्ष्मण, मेरे जीवन साथी, बॉम्बे टू गोवा, अपना देश आणि परिचय यासह अनेक चित्रपटांसाठी संगीत दिले. यादों की बारात, आप की कसम, शोले आणि आंधी यांसारख्या हिट चित्रपटांसह त्यांचे यश कायम राहिले. बर्मन यांनी संगीतबद्ध केलेल्या हम किसीसे कम नहींमधील क्या हुआ तेरा वादा गाण्यासाठी मोहम्मद रफी यांना सर्वोत्कृष्ट पार्श्वगायकाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. सनम तेरी कसमसाठी त्यांना पहिला फिल्मफेअर सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शक पुरस्कार मिळाला. पंचमदा यांचं वयाच्या ५४ व्या वर्षी ४ जानेवारी १९९४ रोजी निधन झालं.

Nashik Edition
Jun 27, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK